# ‘पुढारी’ व मिशन होमिओपॅथीतर्फे डॉ. निकम यांचे शनिवारी व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दै. ‘पुढारी’ व मिशन होमिओपॅथी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटलचे डॉ. अमरसिंह निकम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.२५) सायंकाळी साडेपाच वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे होणाऱ्या या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असणार आहे.

‘होमिओपॅथी - एक प्रभावी औषधोपचार’या विषयावर डॉ. निकम व्याख्यान देणार आहेत. होमिओपॅथिक उपचारांबाबत श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणार आहेत. पिंपरी येथील आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल व हिलिंग सेंटरच्या माध्यमातून डॉ. निकम कोणत्याही इतर उपचारांशिवाय होमिओपॅथिक उपचाराने अनेक असाध्य व दुर्धर आजारांवर गेली ३० वर्षे रुग्णांवर यशस्वी उपचार करीत आहेत. ८० बेडचे सुसज्ज अशा या होमिओपॅथिक हॉस्पिटलचे ते संस्थापक आहेत. अनेक असाध्य व दुर्धर आजार व अतिदक्षता विभागातील रुग्णांना डॉ. निकम यांनी होमिओपॅथिक उपचारांद्वारे नवसंजीवनी दिली आहे. जिनेथिक व पॅथॉलॉजिक औषध उपचार पद्धतीचा सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी उपयोग करण्यात डॉ. निकम यांनी मोठा हातभार लावला आहे. होमिओपॅथिक औषध उपचारांसंदर्भात ते श्रोत्यांशी आपले अनुभव कथन करणार आहेत.

पुढारी
94.3FM
TomatO
Ekdum Freshh.

मशीन होमिओपॅथी संस्थेद्वारे विविध चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येते. संस्थेतर्फे होमिओपॅथिक उपचाराद्वारे रुग्ण सेवा करून होमिओपॅथिक उपचारांचा प्रचार व प्रसार करणे हा आहे. बी.एच.एम.एस. चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये चर्चासत्रे, ग्रुप डिस्कशन, सेमिनार्स, सोशल कॅम्प, कार्यशाळा आदींचा समावेश आहे. व्याख्यानासाठी मिशन होमिओपॅथीचे डॉ. संदीप नेजदार, डॉ. संदीप पाटील, डॉ. शामप्रसाद पावसे, डॉ. श्रीकांत लंगडे, डॉ. शीतल पाटील, डॉ. प्रिया मोहनानी, डॉ. सागर माने, डॉ. अभिजित चौगुले यांचे सहकार्य लाभले.